UNDP - GCF सहाय्यित 'Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities प्रकल्प राज्यात राबवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक - एस-१०/२०१७/प्र.क्र.६७/फ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २०२१.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र. एस -१०/ २०१७/ प्र. क्र. ६७/ फ- ३, दिनांक ७ जून, २०१७.

२) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, डिपार्टमेंट ऑफ एकानॉमिक अफेअर्स (BC & SF Division) यांचे पत्र एफ क्र. ०७/०६/ (UNDP- GCF) - २०१९, दिनांक २ जुलै, २०१९.

३) केंद्र शासन, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. AS(RSP) /०५/२०२० दि. ६ मार्च, २०२० व क्र. १/AS/(RSP) /२०२०/MoEFCC (GCF) दि. १७ जून, २०२०.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांचे पत्र क्र. कक्ष १/सी/योजना/ प्र.क्र. १५/१२/२०२०-२१ दिनांक २८ जुलै, २०२०.

५) केंद्र शासन, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, यांचे पत्र एफ क्र.१३००८/८१/२०२०-CC दिनांक ६ जानेवारी, २०२१.

प्रस्तावना

केंद्र शासन, UNDP-GEF (United Nations Development Programme - Global Environment Facility) यांच्या अर्थ सहाय्यातून कांदळवन कक्षाकडून - Mainstreaming Coastal and Marine Biodiversity into Production Sectors in Sindhudurg District हा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबवला होता. या प्रकल्पांतर्गत कांदळवन कक्षाच्या माध्यमातून खेकडेपालन, कालवेपालन, सिरी भात शेती (SRI Paddy cultivation), शोभिवंत मासेपालन, कांदळवन पर्यटन असे उपजीविकेचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. सदर प्रकल्पाचे यश विचारात घेऊन त्याची राष्ट्रीय स्तरावर व्याप्ती वाढवण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे UNDP प्रतिनिधीकडून निदेश प्राप्त झाले. त्यानुषंगाने सदर संकल्पना UNDP कडून विकसीत करण्यात येऊन "Enhancing Climate Resilience in Coastal areas of India" हा प्रकल्प Green Climate Fund ला सादर करण्यात आला होता. सदर प्रकल्प सह आर्थिक बांधिलकीव्दारे राज्यात राबविण्यासाठी संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये राज्य शासनाने सहमती दर्शविली आहे. सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

UNDP-Green Climate Fund च्या आंशिक अर्थ सहाय्यातून महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व ओदिशा या तीन राज्यात "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" हा प्रकल्प राबविण्यात येणार असून ग्रीन क्लायमेट फंड यांनी पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांना कार्यान्वयन यंत्रणा व महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व ओदिशा या राज्यांना कार्यान्वयन भागीदार म्हणून घोषित केले आहे. सदर प्रकल्पास Green Climate Fund च्या बोर्डाने ऑक्टोबर, २०१८ मध्ये मान्यता प्रदान केली असल्याचे तसेच पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, केंद्र शासन यांनी सप्टेंबर २०१९ मध्ये UNDP सोबत करार केल्याचे संदर्भ क्र. ३ दिनांक ६ मार्च, २०२० च्या पत्रान्वये कळवले आहे. केंद्र शासनाचे संदर्भीय पत्र क्र. ३ दिनांक १७ जून, २०२० च्या पत्रान्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक कार्य आराखडा तयार करणे तसेच निधीची तरतूद करण्याबाबत कळविले आहे.

सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे संदर्भ क्र. ४ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. केंद्र शासनाने संदर्भ क्र. ५ अन्वये UNDP- GCF प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र शासनास GCF कडून ११,४३२,५९८ अमेरीकन डॉलर्स इतके अनुदान प्राप्त होणार असल्याचे व राज्य शासनाची सह आर्थिक बांधिलकी २६, ८५०,००० अमेरीकन डॉलर्स अशी एकूण प्रकल्प किंमत ३८,२८२,५९८ अमेरीकन डॉलर्स असल्याचे कळविले आहे.

सदर प्रकल्प राज्यात राबवण्यासाठी मा.मंत्रीमंडळाने दिनांक १० जून, २०२१ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. UNDP-GCF सहाय्यित 'Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities प्रकल्प सह आर्थिक बांधिलकीने राज्यात राबवण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. **प्रकल्पाची उद्दिष्ट्ये :**

- नाविन्यपूर्ण सह व्यवस्थापन पध्दतीने किनारपट्टीचे व्यवस्थापन करणे, cross-sectoral नियोजन.
- वातावरणीय आघात आणि आपत्ती नियंत्रित राखण्यासाठी परिसंस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे.
- उद्योजकता विकासासाठी सहज वित्तीय सहाय्य आणि विपणन सुविधा निर्माण करुन वातावरण लवचिक उपजीविकांना सहाय्य करणे.

३. **प्रकल्प फलनिष्पत्ती :**

फलनिष्पत्ती १- किनारी आणि समुद्री परिसंस्था आणि त्यांच्या सेवांची लवचिकता वाढवणे

- परिसंस्था नियोजन व समूहाधारीत अनुकूलन उपक्रम तयार करण्यासाठी सागर किनाऱ्यांच्या धोक्यांचे मूल्यमापन करणे.
- परिसंस्थांची लवचिकता वाढवण्यासाठी किनारी परिसंस्थांचे समूहाधारीत संवर्धन आणि पुनर्स्थापना करणे.

फलनिष्पत्ती २- किनारपट्टीवरील जनसमूहांच्या अनुकूलन क्षमता वाढीसाठी वातावरण लवचिक उपजीविका

- बाजारपेठांशी असणारे मार्ग बळकट करुन वातावरण लवचीक उपजीविका आणि उद्योग स्थापन करणे.
- समूहाधारीत अनुकूलन आणि वातावरण लवचिक उपजीविकांसाठी स्थानिक जनसमूहांची क्षमताबांधणी करणे.

फलनिष्पत्ती ३- किनारपट्टी आणि समुद्री व्यवस्थापन आणि संस्थात्मक ढाचा बळकट करणे.

- वातावरण लवचिकता आणि सर्व किनारपट्टीय राज्यात एकात्मिक नियोजन व कारभारासाठी संस्थांचे जाळे निर्माण करणे.
- वातावरण बदलाशी अनुकूलन करण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांची धोरणे, आराखडे आणि अर्थसंकल्पात परिसंस्थाधारीत दृष्टीकोन एकात्मिकृत करणे.
- किनारपट्टी लवचिकतेसाठी माहिती व्यवस्थापन.

४. **प्रकल्पाचा कालावधी :** सदर प्रकल्पाचा कालावधी ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत राहील.

५. प्रकल्प मूल्य आणि राज्याचा हिस्सा

प्रकल्पाचा एकूण मंजूर आराखडा १३०.२६ दशलक्ष अमेरीकन डॉलर्सचा असून त्यातील GCF चा हिस्सा ४३.४१ दशलक्ष डॉलर्स इतका राहणार आहे. महाराष्ट्र शासनास GCF कडून प्रकल्प व्यवस्थापनासाठी २.११ दशलक्ष अमेरीकन डॉलर्स व परिसंस्था पुन:स्थापन व उपजीविका विषयक उपक्रमांसाठी ९.३२ दशलक्ष अमेरीकन डॉलर्स असे एकूण ११.४३ दशलक्ष अमेरीकन डॉलर्स इतके अनुदान प्राप्त होणार आहे. त्याचा तपशील परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने राज्य शासनाची सह आर्थिक बांधिलकी २६.८५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स अपेक्षित होती, तथापि प्रकल्पाच्या मूळ आऱाखड्यानुरुप GCF कडून अनुदान प्राप्त होणार नसल्याने राज्य शासनाने सह आर्थिक बांधिलकी १९ दशलक्ष अमेरीकन डॉलर्स (रु १४०.९० कोटी) इतकी मर्यादीत केली आहे.

बाहय सहाय्यित प्रकल्पाच्या कालावधीमध्ये तसेच अमेरिकन डॉलर- रुपये यातील परस्पर परिवर्तन किंमतीमध्ये (US Dollar Conversion rate) होणारे बदल लक्षात घेता, वित्त विभागाने भारतीय चलनामध्ये मान्यता दिलेल्या सह आर्थिक बांधिलकी रक्कमेपेक्षा (रु. १४०.९० कोटी) अधिक रक्कमेच्या खर्चाच्या प्रस्तावास वित्त विभागाची पुन्हा सहमती घेणे बंधनकारक राहील.

६. प्रकल्पातील उपक्रम :-

प्रकल्पांतर्गत परिसंस्था पुन: स्थापन व उपजीविका विषयक खालीलप्रमाणे उपक्रम सह आर्थिक बांधिलकीतून राबविण्यात येणार आहे -

परिसंस्था पुन: स्थापन

- कांदळवनांचे पुन: स्थापन व पुन:स्थापित कांदळवनांची ३ वर्ष देखभाल (३१०० हेक्टर)
- प्रवाळ परिसंस्थांचे पुन: स्थापन व पुन:स्थापित प्रवाळ परिसंस्थांची ३ वर्ष देखभाल (३५ हेक्टर)
- अवनत पाणलोट क्षेत्राचे पुन: स्थापन व पुन:स्थापित पाणलोटांची ३ वर्ष देखभाल (६०० हेक्टर)

उपजीविका विषयक उपक्रम

- कांदळवनातील खेकडेपालन
- शिंपले शेती
- कालवं शेती
- खेकडा उबवणूक केंद्र
- शोभिवंत मासेपालन / मासे उबवणूक केंद्र
- सी विड फार्मिंग
- भातशेतीकरता SRI (System of Rice Intensification) तंत्र
- मासे मूल्यवर्धित उत्पादने
- मत्स्य खाद्य उत्पादन घटक
- मासे वाळवण /धुरळणी केंद्र
- मध उत्पादन

७. प्रकल्पाचे कार्यक्षेत्र :

सदर प्रकल्प राज्यातील ४ किनारी जिल्ह्यातील ११ तालुक्यात राबवला जाणार आहे- सिंधुदुर्ग (देवगड, मालवण, वेंगुर्ला) रत्नागिरी (दापोली, गुहागर, राजापूर व रत्नागिरी), रायगड (श्रीवर्धन व अलिबाग) आणि पालघर (पालघर, डहाणू).

८. प्रकल्प कार्यान्वयन :

अ) या प्रकल्पासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष) हे केंद्रस्थ अधिकारी तसेच राज्य प्रकल्प संचालक असतील. त्यांना प्रकल्प संदर्भात केंद्र शासन तसेच UNDP सोबत आवश्यक पत्रव्यवहार करण्यास शासनाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत आहे. राज्य प्रकल्प संचालक हे राज्यस्तरावर प्रकल्पाच्या सर्वांगीण अंमलबजावणीसाठी जबाबदार राहतील. प्रकल्पाच्या वार्षिक आराखड्यास अधीन राहून प्रकल्प आराखडयात नमूद केलेली नियोजित फलनिष्पत्ती, नमूद केलेले नियोजन सुनियोजीतरित्या अंमलबजावणी करतील. प्रकल्प संचालक UNDP, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, विविध विभाग व यंत्रणेंशी समन्वय साधणे, प्रकल्प चमुस मार्गदर्शन करणे, अहवालाचा आढावा घेणे तसेच प्रकल्पाशी संबंधित प्रशासकीय व वित्तीय बाबींवर देखरेख करण्याचे काम पहातील. UNDP-GCF प्रकल्पांतर्गत UNDP कडून अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत आवश्यकतेनुसार Saving/Current account उघडण्यासाठी त्यांना मान्यता देण्यात येत आहे.

ब) प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी योग्य रीतीने करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहेत.

१. राज्य प्रकल्प सुकाणू समिती (State Project Steering Committee- SPSC)

I. मुख्य सचिव - अध्यक्ष
II. अपर मुख्य सचिव (वित्त) - सदस्य
III. अपर मुख्य सचिव (नियोजन) - सदस्य
IV. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (वने) - सदस्य
V. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (पर्यावरण) - सदस्य
VI. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (पर्यटन) - सदस्य
VII. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (कृषी) - सदस्य
VIII. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (पदुम) - सदस्य
IX. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (ग्राम विकास) - सदस्य
X. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ - सदस्य
XI. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) नागपूर - सदस्य
XII. पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालय प्रतिनिधी - सदस्य
XIII. UNDP चे प्रतिनिधी - सदस्य
XIV. राज्य शासन नियुक्त स्वयंसेवी संस्था (उपक्रमांशी सबंधित) प्रतिनिधी- विशेष आमंत्रित
XV. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई तथा प्रकल्प केंद्रस्थ अधिकारी- सदस्य सचिव

समितीस आवश्यकतेनुसार प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधित अधिकाऱ्यांना आमंत्रित करण्याची मुभा राहील.

सदर समिती वार्षिक कार्य आराखड्यास मान्यता देणे, प्रकल्प समन्वयन व अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्याचे कार्य करेल. सदर समितीची बैठक वर्षातून किमान दोनदा घेण्यात येईल.

२. जिल्हास्तरीय समन्वयन समिती (District Level Coordination Committee - DLCC)

I. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
II. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- सदस्य
III. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी- सदस्य
IV. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय- सदस्य
V. जिल्हा नियोजन अधिकारी- सदस्य
VI. जिल्हास्तरीय प्रकल्प समन्वयक - विशेष आमंत्रित
VII. स्वयंसेवी संस्था (उपक्रमांशी संबंधित) प्रतिनिधी - विशेष आमंत्रित
VIII. उप वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी - सदस्य सचिव

सदर समिती जिल्हास्तरावरील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व प्रकल्प समन्वयन यासाठी जबाबदार असेल. तसेच जिल्हास्तरीय विविध Production Sector समवेत पुरेसा समन्वय साधण्यासाठी प्रयत्नशील असेल. सदर समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात येईल.

क) प्रकल्पाच्या दैनंदिन कार्यान्वयनासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१. राज्य प्रकल्प व्यवस्थापन घटक (State Project Management Unit- SMPU)

i. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई (राज्य प्रकल्प संचालक)
ii. उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष
iii. राज्य प्रकल्प व्यवस्थापक
iv. प्रशासन नि वित्त अधिकारी
v. संसूचना, संनियंत्रण, मूल्यांकन तज्ञ
vi. सामाजिक, आर्थिक व उपजीविका तज्ञ

राज्य प्रकल्प व्यवस्थापन घटक हे राज्य स्तरावर समन्वय साधतील आणि राज्य प्रकल्प सुकाणू समितीस सहाय्य करतील. राज्य प्रकल्प व्यवस्थापक हे राज्य प्रकल्प संचालकांना सहाय्य करतील. राज्य प्रकल्प व्यवस्थापक हे पुढील कामांसाठी जबाबदार राहतील. १) प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित विविध हितसंबंधी, राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या विविध यंत्रणा आणि UNDP - GCF यांच्या समवेत संनियंत्रण व समन्वयन साधणे. २) प्रकल्प मूल्यांकनाचे आयोजन करणे. ३) प्रकल्प अंमलबजावणी मधील सर्व भागीदारांकडे योग्य अभिलेख / कागदपत्रे असल्याचे सुनिश्चित करणे आणि दस्तऐवजीकरण अहवालात सहयोग करणे. ४) प्रकल्पाच्या फलनिष्पत्तीबाबत साहित्य प्रकाशित करण्यास सहाय्य करणे.

२. जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन घटक (District Project Management Unit-DPMU)

i. वनक्षेत्रपाल
ii. जिल्हास्तरीय प्रकल्प समन्वयक
iii. तांत्रिक तज्ञ / विशेषज्ञ
iv. क्षेत्रिय सहयोगी/ UNDP स्वयंसेवक

जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन घटक हे जिल्हास्तरीय समन्वय समितीस सहाय्य करतील. आणि प्रकल्प अंमलबजावणी, संनियंत्रण व मुल्यांकनास तांत्रिक सहाय्य / मार्गदर्शन करतील.

९. <u>निधीची उपलब्धता :-</u>

प्रकल्पासाठी आवश्यक एकूण सह आर्थिक बांधिलकी रु. १४०.८६ कोटी (वन विभाग - रु. १००.२६ कोटी, मत्स्य विभाग - रु. १७.२० कोटी, कृषि विभाग - रु. १८.९० कोटी व परिवहन विभाग - रु. ४.५० कोटी) राहील. त्यानुसार प्रकल्प कालावधीत वार्षिक कार्य आराखड्यानुसार निधीची तरतूद करण्याची कार्यवाही संबंधित विभागाकडून करण्यात येईल.

१०. <u>नवीन लेखाशीर्ष</u> :- सदर प्रकल्पांतर्गत सह आर्थिक बांधिलकीसाठी अनुदान उपलब्ध करुन घेण्यासाठी "UNDP-GCF Project - Enhancing Climate Resilience in Coastal areas of India" ह्या नावाने नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि दरम्यानच्या कालावधीमध्ये राज्याच्या सह आर्थिक बांधिलकीपोटी येणारा खर्च "कांदळवन संरक्षण व उपजीविका निर्माण योजना " या लेखाशिर्षातून (२४०६ ए२२९) करण्यात येईल.

प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरीता संबंधित विभागांकडून आवश्यक निधी त्या त्या विभागाच्या प्रचलित योजनांच्या लेखाशिर्षामधून उपलब्ध करुन घेण्यात यावा.

११. हा प्रकल्प राबविताना पर्यावरण संरक्षण अधिनियम,१९८६ व त्यात नमूद अधिसूचना, तरतुदी, नियम इत्यादी तसेच जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४, वायु (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८१ व प्रचलित कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) अधिसूचना मधील नमूद तरतूदी बंधनकारक राहतील.

१२. सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौ.सं.क्र. ७९/१४७५/२०२१ - दिनांक ३०.०३.२०२१, कृषि विभाग अनौ.सं.क्र. १/२०२०/८-अ - दिनांक २७.११.२०२०, मत्स्य व्यवसाय विकास विभाग अनौ.सं. क्र.८३८/२०२०/पदुम-१४- दिनांक ९.११.२०२०, परिवहन विभाग अनौ.सं. क्र ३८६४/२०२०/बंदरे-२ - दिनांक १८.१२.२०२० व वित्त विभाग अनौ.सं. क्र. २५६४/२०२१/व्यय-१० - दिनांक १५.०४.२०२१ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०७०११२११०९०४१९ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

B.V Gopal Reddy

Digitally signed by B.V Gopal Reddy
DN: CN = B.V Gopal Reddy, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2021.07.01 12:32:47 +05'30'

(बी. वेणुगोपाल रेड्डी)
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५) सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली.

६) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, (परिवहन) विभाग, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई
१३) सचिव (कृषि) विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर
१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१८) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई
१९) महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
२०) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, नवी मुंबई
२१) जिल्हाधिकारी (रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर)
२२) मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे व कोल्हापूर
२३) आयुक्त, कृषी, पुणे
२४) आयुक्त, मत्स्यव्यवसाय
२५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ
२६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर)
२७) उप वनसंरक्षक, डहाणू, अलिबाग, रोहा, सावंतवाडी
२८) विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी स्थित चिपळूण
२९) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर)
३०) सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर)
३१) जिल्हा नियोजन अधिकारी (रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर)
३२) UNDP- India, New Delhi.
३३) निवड नस्ती कार्यासन फ-३, मंत्रालय, मुंबई.

S. No	Activities	Quantity	Unit Cost US$		Cost in US$
		ha		INR	
Output 1					
1	State consultancy				30,000
2	Restoration of Mangrove	3100	600	44310	1860000
	Maintenance of Restored Mangroves (for 3 years)	3100	100	7385	930000
3	Restoration of Coral Ecosystem	35	50,000	3692500	1750000
	Maintenance of Restored Coral Ecosystem (for 3 years)	35	5000	369250	525000
4	Restoration of Degraded Watershed	600	575	42463.75	345000
	Maintenance of Restored Watershed (for 3 years)	600	125	9231.25	225000
Total: Output 1					5665000
Output 2					
1	Training on livelihood (workshops for 10 landscapes over 3 years)	21*	4306	317998.1	93000
2	Capacity Building of Women (for landscapes over 2 years)	16	2000	147700	32000
	Public awareness	1	40000	2954000	40000
3	i) Livelihood support for SRI (as per households)	101000 households	8	590.8	808000
	ii)Livelihood support for Crab Hatcheries (1 hatchery per state)	1 hatchery per state	335075	24745288.75	335075
	iii)Livelihood support for seaweed farming (farming units, 1 per family)	338	139	10265.15	46982
	iv)Crab fattening (as per households)	1444 households	231	17059.35	333641
	v)Mussel farming (as per mussel raft)	615 mussel rafts	540	39879	332280
	vi)Oyster Farming (as per oyster raft)	1737 oyster rafts	1813	133890.05	937800
	vii) Ornamental Fisheries (as per fish tank)	812 fish tanks	547	40395.95	444346
Total: Output 2					3,403,115
Output 3					
1	Multi-stakeholder Coordination Meetings (annual meeting in landscapes over 6 years)	43*	6000	443100	259200
Total: Output 3					259200
Grand Total of Output 1+2+3					9,327,315
Project management costs**					2,105,283
Total budget for Maharashtra (GCF Contribution)					11,432,598
Co- Financing					19,000,000
Total Project Cost:					30,432,598

UNDP-GCF Funded –Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities' Regarding implementation of the project in the state.

Government of Maharashtra
Revenue and Forests Department
Government Resolution No. - S-10/2017/ CR.67/F-3
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032.
Date: 1st July, 2021.

Ref: 1. Government of Maharashtra, Revenue and Forest Department's letter No. S10/2017/ CR- 67/F3, dated 7th June 2017.
2. Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs (BC and SF Division) Letter F. No. 07/06/ (UNDP- GCF) – 2019 dated 2nd July 2019.
3. Government of India, Ministry of Environment, Forests and Climate Change, Letter No.AS (RSP)/05/2020, dated 6th March 2020 and Letter No.01/AS/(RSP)/2020/MoEFCC (GCF) dated 17.06.2020.
4. Principal Chief Conservator of Forest (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur Letter No. Desk- 1/ C/Plan/CR.15/ 12/2020-21 dated 28th July 2020.
5. Government of India, Ministry of Environment, Forests, and Climate Change Letter F. No. 13008/81/2020-CC dated 6th January 2021.

Preface :

Mangrove Cell implemented Government of India & UNDP- GEF (United Nations Development Programme, Global Environment Facility) funded project "**Mainstreaming Coastal & Marine Biodiversity into Production Sectors in Sindhudurg district**". Mangrove Cell implemented various livelihood projects such as Mud crab farming, Oyster cultivation, SRI Paddy cultivation, Ornamental fisheries, Mangrove ecotourism under this project. Considering the success of this project, UNDP representatives requested to scale up this model at national level. The said concept was developed by UNDP as project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" and submitted to Green Climate Fund. The State Government, vide letter at reference no. 1, have given approval for implementation of the said project through co-finance. Government of India, Ministry of Finance, vide letter at reference no. 2, have given approval to this project.

The project "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" is partially funded by UNDP-GCF and is to be implemented in States of Maharashtra, Andhra Pradesh and Odisha. Ministry of Environment, Forest and Climate Change (MoEFCC), Government of India is going to be implementing agency for Green Climate Fund and States of Maharashtra, Andhra Pradesh and Odisha are declared as implementing partners. The Board of Green Climate Fund have approved this project in 2018 and MoEFCC, India had signed an agreement with UNDP in September 2019, which is mentioned in letter at reference no. 3, dated 6th March 2020. Government of India, Ministry of Environment, Forest & Climate Change, vide letter dated 17th June 2020, has asked State Government to prepare Annual Work Plan (AWP) for FY 2020-21 and make provision for funds in the budget.

Principal Chief Conservator of Forest (Head of Forest Force), Maharashtra State, vide letter at reference no. 4, has submitted proposal for implementation of the said project in State of Maharashtra. Government of India, Ministry of Environment, Forest & Climate Change, vide letter at reference no. 5, informed that under UNDP-GCF project Maharashtra Government will be receiving grants of U.S. $11,432,598 from GCF and with State Government's Co-finance of $ 26,850,000 total project cost will be U.S. $38,282,598.

It was under consideration of the Government to issue Government Resolution as Hon'ble Cabinet in meeting held on 10thJune 2021 approved to implement the said project in the State of Maharashtra.

Government Resolution: -

1. The approval of the Government is given for implementation of UNDP-GCF Project - "Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities" through Co- finance.

2. Objectives of Project:

- Management of coastal areas through innovative co-management techniques and include cross-sectoral planning.
- To invest in basic functions and services of ecosystem to minimize the impact of climate variability and disaster management.
- Building an ecosystem for entrepreneurship development through easy access to financial services and marketing facility to support the livelihood activities.

3. Project Outcomes:

Outcome 1 - Increasing the flexibility of coastal and marine ecosystems and their services.

- Evaluate coastal hazards to create ecosystem planning and community-based adaptation initiatives.
- Collective conservation and restoration of marginal ecosystems to increase the resilience of ecosystems.

Outcome 2 - Environment Flexible Livelihoods for Increased Capacity Building of Coastal Populations

- Establishing environmentally resilient livelihoods and industries by strengthening access to markets.
- Capacity building of local communities for group-friendly and environmentally resilient livelihoods.

Outcome 3 - Strengthening coastal and marine management and institutional structure.

- Environmental flexibility and building a network of institutions for integrated planning and governance in all coastal states.
- Integrate ecological perspectives into public, private sector policies, plans and budgets to adapt to climate change.
- Information management for coastal flexibility.

4. Duration of the Project

The duration of the project will be till December 31, 2025.

5. Project Cost and State Share

The total approved plan for the project is USD 130.26 million, of which GCF's share will be USD 43.41 million. Government of Maharashtra will receive a total grant of USD 11.43 million from GCF, out of which USD 2.11 million for Project Management Cost and USD 9.32 million for ecosystem restoration and livelihood initiatives.

The Co-finance commitment of the State Government was expected to be USD 26.85 million. However, the State Government has limited the Co-finance commitment to USD 19 million (Rs 140.90 Crore), as it will not be receiving grants from GCF as per the original outline of the project.

In case of change in US Dollar-Rupee Conversion Rate during the period of the Externally Assisted Project and the US Dollar Conversion Rate, the Department shall be bound for taking approval of Finance Department, if the amount of Co-finance exceeds the sanctioned amount of Rs. 140.90 Crore in Indian currency.

6. **Project Activities: -**

The following activities related to ecosystem restoration and livelihood activities under the project will be implemented with Co-finance commitment -

Ecosystem Restoration

- Mangrove Restoration and maintenance of the restored mangroves for 3 years (3100 ha)
- Coral Restoration and maintenance of restored coral for 3 years (35 ha)
- Degraded Watershed Restoration and maintenance of restored degraded watersheds for 3 years (600 ha)

Livelihood Activities

- Crab farming in Mangroves
- Mussel farming
- Oyster farming
- Crab hatchery
- Ornamental fish farming / hatchery
- Seaweed farming
- SRI (System of Rice Intensification) for paddy cultivation
- Fish value added products.
- Fish food production unit
- Fish drying / smoking unit
- Apiculture

7. **Project Area: -**

The project will be implemented in 11 talukas of 4 coastal districts of the state - Sindhudurg (Devgad, Malvan, Vengurla), Ratnagiri (Dapoli, Guhagar, Rajapur and Ratnagiri), Raigad (Shrivardhan and Alibag) and Palghar (Palghar, Dahanu).

8. **Implementation of the Project: -**

A) The Additional Principal Chief Conservator of Forests, Mangrove Cell, will be the Nodal Officer as well as the State Project Director (SPD) for the project. The SPD is authorized by the State Government to engage in necessary correspondence with the Central Government as well as UNDP regarding the project. The SPD will be responsible for overall implementation of the project at the State level, including adherence to the AWP and achievement of planned results as outline in the Project document, and for the use of Project funds through effective management and well-established project review and oversight mechanisms. The SPD will also ensure co-ordination with UNDP, MoEFCC, Various Departments and agencies; provide guidance to the project team; review reports and look after the administrative and financial arrangements related to the projects. The SPD is authorized to open a Saving / Current account in a Nationalized Bank as required by UNDP to receive grants under the UNDP-GCF project.

B) The following Committees are being constituted for proper implementation of the project in the State:

1. State Project Steering Committee (SPSC)

I. Chief Secretary - Chairman
II. Additional Chief Secretary (Finance) – Member
III. Additional Chief Secretary (Planning) – Member
IV. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (Forest) – Member
V. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (Environment) – Member
VI. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (Tourism) – Member
VII. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (Agriculture) – Member
VIII. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (ADF) – Member
IX. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary (Rural Development Department) - Member
X. Chief Executive Officer, Maharashtra Marine Board – Member
XI. Principal Chief Conservator of Forests (Budget, Planning and Development) Nagpur – Member
XII. Representative of Ministry of Environment, Forests and Climate Change - Member
XIII. Representative of UNDP - Member
XIV. Representative of NGO (related to activities) appointed by State Government - Special Invitee
XV. Additional Principal Chief Conservator of Forests, Mangrove Cell, Mumbai, and Nodal Officer - Member Secretary

The SPSC may invite any other officials involved in project implementation, as and when required. The Committee shall approve the Annual Work Plan, review the progress of project implementation, and take appropriate decisions for the smooth implementation of the Project within the State. The Committee shall meet at least twice in a year.

2. **District Level Coordination Committee (DLCC)**

I. Collector - Chairman
II. Chief Executive Officer, Zilla Parishad- Member
III. District Superintendent Agriculture Officer- Member
IV. Assistant Commissioner, Fisheries- Member
V. District Planning Officer- Member
VI. District Level Project Coordinator - Special Invitee
VII. Representatives of NGOs (related to activities) - Special Invitee
VIII. Deputy Conservator of Forests / Divisional Forest Officer - Member Secretary

The DLCC shall be responsible for district level planning, implementation, monitoring and co-ordination. In addition, this Committee shall endeavor to ensure adequate co-ordination with the various production sectors at the district level. The Committee shall meet at least once in three months.

C. The following arrangement is made for day-to-day operation of the project: -

1. State Project Management Unit (SMPU)

i. Additional Principal Chief Conservator of Forests, Mangrove Cell, Mumbai (State Project Director)
ii. Deputy Conservator of Forests, Mangrove Cell
iii. State Project Manager

iv. Administration and Finance Officer
v. Information, Monitoring, Evaluation Specialists
vi. Socio Economic and Livelihood Expert

The State Project Management Unit (SPMU) will be responsible for co-coordinating the project at the State level and support the SPSC. The SPD will be supported by the State Project Manager (SPM) whose responsibilities includes: i) Co-coordinating project implementation with all stakeholders, State Government and Central Government agencies and UNDP-GCF; ii) organizing the project evaluations; iii) ensuring that there is adequate documentation by all implementing partners at all stages and in collating this documentation into report; and iv) facilitating the publication of project outputs.

2. District Project Management Unit (DPMU)

i. Range Forest Officer
ii. District Level Project Coordinator
iii. Technical Expert / Specialist
iv. Regional Assistants / UNDP Volunteers

The DPMU shall assist DLCC and shall provide technical leadership for project implementation, monitoring and evaluation and adaptive management.

9. <u>Availability of Funds:</u> -

The total Co-finance required for the project is Rs. 140.86 Crore (Forest Department - Rs. 100.26 Crore, Fisheries Department - Rs. 17.20 Crore, Agriculture Department - Rs. 18.90 Crore and Transport Department - Rs. 4.50 Crore). Accordingly, the concerned department shall ensure that adequate budget provision is made as per the Annual Work Plan during the project period.

10. <u>New Budget Head:</u> -

Approval is given to open a new Budget head “UNDP-GCF Project - Enhancing Climate Resilience of India's Coastal Communities” for making available the grants for Co-finance under this project. However, in the meantime, the expenditure incurred for the co-finance of the State shall be borne under the budget head "Mangrove Conservation and Livelihood Creation Scheme" (2406A229).

The funds required for the schemes to be implemented under the project shall be made available by the concerned departments from the budget head of the existing schemes of the concerned departments.

11. While implementing this project, the provisions of Environmental (Protection) Act, 1986 and rules, notifications etc. issued under the Act, as well as Water (Prevention and Control of Pollution) Act, 1974, Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981 and prevailing Coastal Regulation Zone (CRZ) notification) will remain binding.

12. This Government Resolution is being issued with the concurrence of Planning Department UOR No. 79/1475/2021 dated 30.03.2021, Agriculture Department UOR No. 1/2020/8-A dated 27.11.2020, Fisheries Department UOR No. 838/2020/ADF-14 dated 9.11.2020, Transport Department UOR No.3864/2020/Port-2 dated 18.12.2020 and Finance Department vide UOR No.2564/2021/Exp-10 dated 15.04.2021.

This Government Resolution has been made available on the website of the Government of Maharashtra www.maharashtra.gov.in and its computer code is 202107011211090419. This Government Resolution is being attested by digital signature.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B.V Gopal Reddy

Digitally signed by B.V Gopal Reddy
DN: CN = B.V Gopal Reddy, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2021.07.01 12:33:17 +05'30'

(B. Venugopal Reddy)
Principal Secretary (Forest)
Revenue & Forests Department.

Copy to: -

1) Principal Secretary to the Hon. Chief Minister
2) Secretary to Hon. Deputy Chief Minister
3) Private Secretary to the Hon. Minister of State (Forests)
4) Chief Secretary, Government of Maharashtra
5) Secretary, Environment, Forest & Climate Change, Government of India, New Delhi
6) Additional Chief Secretary (Finance), Mantralaya, Mumbai
7) Additional Chief Secretary (Planning), Mantralaya, Mumbai
8) Additional Chief Secretary (Revenue), Revenue and Forests Department, Mantralaya, Mumbai
9) Additional Chief Secretary (Transport) Mantralaya, Mumbai
10) Additional Chief Secretary (Rural Development Department) Mantralaya, Mumbai
11) Principal Secretary (Environment), Mantralaya, Mumbai
12) Principal Secretary (ADF), Mantralaya, Mumbai
13) Secretary (Agriculture), Mantralaya, Mumbai
14) Principal Secretary (Tourism), Mantralaya, Mumbai
15) Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maha . State, Nagpur
16) Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur
17) Principal Chief Conservator of Forests (Budget, Planning & Development) Maharashtra State, Nagpur
18) Additional Principal Chief Conservator of Forests (Mangorve Cell), Mumbai
19) Accountant General -I/II (Accounts & Audit) Mumbai / Nagpur.
20) Divisional Commissioner, Konkan Division, CBD Belapur, Navi Mumbai.
21) Collector (Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Palghar)
22) Chief Conservator of Forests (T)Thane / Kolhapur.
23) Commissioner (Agriculture), Pune.
24) Commissioner (Fisheries), Mumbai.
25) Chief Executive Officer, Maharashtra Maritime Board, Mumbai.
26) Chief Executive Officer, Zilla Parishad (Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Palghar)
27) Deputy Conservator of Forests, Dahanu, Alibaug, Roha, Sawantwadi.
28) Divisional Forest officer, Ratnagiri at Chiplun
29) District Agriculture Officer (Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Palghar)
30) District Planning Officer (Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Palghar)
31) Assistant Commissioner of Fisheries (Raigad, Ratnagiri, Sindhudurg, Palghar)
32) UNDP -India, New Delhi.
33) Select File (F-3) Mantralaya, Mumbai

Accompaniment to Government Resolution No. S-10/2017/C.R.-67/ F-3, Dated 1st July, 2021

S. No	Activities	Quantity	Unit Cost US$		Cost in US$
		ha		INR	
Output 1					
1	State consultancy				30,000
2	Restoration of Mangrove	3100	600	44310	1860000
	Maintenance of Restored Mangroves (for 3 years)	3100	100	7385	930000
3	Restoration of Coral Ecosystem	35	50,000	3692500	1750000
	Maintenance of Restored Coral Ecosystem (for 3 years)	35	5000	369250	525000
4	Restoration of Degraded Watershed	600	575	42463.75	345000
	Maintenance of Restored Watershed (for 3 years)	600	125	9231.25	225000
Total: Output 1					5665000
Output 2					
1	Training on livelihood (workshops for 10 landscapes over 3 years)	21*	4306	317998.1	93000
2	Capacity Building of Women (for landscapes over 2 years)	16	2000	147700	32000
	Public awareness	1	40000	2954000	40000
3	i) Livelihood support for SRI (as per households)	101000 households	8	590.8	808000
	ii)Livelihood support for Crab Hatcheries (1 hatchery per state)	1 hatchery per state	335075	24745288.75	335075
	iii)Livelihood support for seaweed farming (farming units, 1 per family)	338	139	10265.15	46982
	iv)Crab fattening (as per households)	1444 households	231	17059.35	333641
	v)Mussel farming (as per mussel raft)	615 mussel rafts	540	39879	332280
	vi)Oyster Farming (as per oyster raft)	1737 oyster rafts	1813	133890.05	937800
	vii) Ornamental Fisheries (as per fish tank)	812 fish tanks	547	40395.95	444346
Total: Output 2					3,403,115
Output 3					
1	Multi-stakeholder Coordination Meetings (annual meeting in landscapes over 6 years)	43*	6000	443100	259200
Total: Output 3					259200
Grand Total of Output 1+2+3					9,327,315
Project management costs**					2,105,283
Total budget for Maharashtra (GCF Contribution)					11,432,598
Co- Financing					19,000,000
Total Project Cost:					30,432,598